म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
ग्र. नं. ६४२

जयतेतराम ।

# सङ्गीत प्रेमदर्शन नाटकांतील

# पद्यावली.

हें पुस्तक

## माधवराव नारायण पाटणकर

( पाटणकर संगीत कंपनीचे मालक )

यांनीं रचिलें.

तें

खेमराज श्रीकृष्णदास यांच्या
"श्रीविङ्कटेश्वर" स्टीम् प्रेसमध्यें
मुद्रित करून प्रसिद्ध केलें
ता० २० । ७ । १९०१.

किंमत २ आणे.

ह्या पुस्तकाची मालकी सन् १८६७ च्या २५ व्या
आक्टाप्रमाणें नोंदून पुस्तक छापविण्याचा व
रंगभूमीवर प्रयोग करण्याचा वगैरे सर्व हक्
कर्त्यानें आपलेकडे ठेविले आहेत.

से.ग्रंथ १०८

# समर्पण.

हें 'पद्यावली' चें पुस्तक माझे परम सन्मान-
नीय व व्यवसाय मित्र बंधू कैलासवासी
रा० रा० भाऊरावजी कोल्हटकर
यांची अलौकिक नाट्य कुशलता,
कण्ठमाधुर्य सौजन्य रसिकता
इत्यादि अमूल्य गुणस्मर-
णास्तव सप्रेम अर्पण
केलें असे.

पुस्तककर्ता.

# प्रस्तावना.

"समानशीलव्यसनेषु सख्यम्"

अखिल जग प्रेमानें कसें भरलें आहे, हें तात्विक विचारी जनांला अनुभवानें समजतेंच. प्रस्तुत नाटकांत समाजप्रीति, मित्रप्रीति व प्रेम या तिहींची सांगड नैसर्गिक गुणामुळें कशी ग्रथित झाली आहे हें मार्मिक व रसिक जनांनीं प्रेमयुक्त दृष्टीनें अवलोकन केल्यास कर्त्याच्या श्रमाचें अंशतः तरी सार्थक होईल अशी आशा आहे.

मा० ना० पाटणकर.

सं.काव्य
१०८
८४

श्रीगुरुदत्तप्रसन्न.

# सङ्गीत प्रेमदर्शन नाटकाची

# पद्यावली.

## अंक पहिला १.

### मंगलाचरण.

पद १ लें. ( प्यारे नवल या चा० )

दयाघना सुमनें नमूनि तुज ॥ विघ्नविनाशन गिरि-
जानंदन शुभकर हें तव स्तवन कथामृत ॥ध्रु०॥
सुफल देतसे नम्र जनांसी ॥ मंगल वेळीं तव
चरणासी ॥ शरण येइ तुज पुरवि मनोरथ ॥
हीच आस मनिं नांदत शिवसुत ॥ ध्रु० ॥
रसिक जनां ही नवीन रचना ॥ बोध प्रद हो
राजिव नयना ॥ प्रेमकुतूहल अवलोकुनिया ॥
सदैव माधव माधविं हो रत ॥ ध्रु० ॥

पद २ रें. ( रामनामी दंग व्हा या चा० )

सख्या—श्रीशाम सुंदर इंदिरावर पादपंकज वंदुनी ॥

झणि पार व्हा भवसागरांतुनि ईश्वरा मनिं चिंतुनी ॥ बिन मोल मानव देह हा वरचेवरी नच ये जनीं ॥ जानिं काय हा जल बुद्बुदापरि कीं असे म्हणुनी झणी ॥ बघ काल येइल पाश घेउनि न्यावया जगतांतुनी ॥ गारिबास द्या तुम्हि आश्रया तनु मानसा धन वेंचुनी ॥ जगदीश्वरा करितात जे जनिं साह्य तें समजा धनी ॥ अति नम्र माधवदास हा रत हो रमाधव चिंतनीं ॥ ध्रु० ॥

पद ३ रें ( आनंद भारी या चा० )

**नटी**:—नीतिस द्यावें हृदयिं स्थल अहर्निशि सखया ॥ लोकीं मान्यता मिळेलचि पहा सहज झणि सुसमया ॥ विफल जन्म नाथा न करावा स्वजन अवन करा या ॥ ध्रु ॥ स्वार्थ त्यागा निशिदिनिं झडकरि ॥ विनंति असे न रोष मनिं तिळभरहि ठेवुनी ॥ कटुवचन वदते त्यजुनि संशया प्रियकरा मी ॥ सुयश देइल मुरारी जगतिं फल ॥ नीतिस ॥ ध्रु० ॥

पद ४ थें. ( रे रे म प सा या चा० )

**सूत्रधार**:—नृप मन संशयांत पडुनियां सज्जन छल निशिदिनिं करितसे जगतिं या ॥ ध्रु० ॥ मत्सर कलह प्रखर वन्हि आपसात भडकवूनी जन हित दिशोघाडि लावितसे प्रियसखि भुवरिया ॥ध्रु०॥

संस्-काव्य
१०९



पद ५ वें. ( तुजविण हरि मजकोणरे या चा० )

**नटीः**--तनु मन धन जनिं वेचुनी ॥ होइल मान्य सहज भूवरती ॥ चतुर सुजन नर लौकिक यश मिळवी भुवनीं ॥ ध्रु ॥ बहुत परिश्रम खर्चुनि ओतिली विधिरायें नर काया ॥ जगतींया ॥ स्वकरा शिणवुनिया ॥ जन्म मृत्यु चुकवाया ॥ आत्मवत सकल जगत हें मानुनी ॥ ध्रु० ॥

पद ६ वें. ( सुखोपभोग या चा० )

**सूत्रधारः**–अन्नासाठीं तडफड करिती नेत्रीं आणुनि प्राण ॥ परी कुणाला करुणा नच ये तिळ तिळ तुटुनी जाण ॥ पळपळ युग हें भासे गरिबा अंगीं नुरलें त्राण ॥ बाण भुकेचा प्राणाची या करितो दाणादाण ॥ ज्याच्या अंगी भूतदयेचा वास न त्यासि सुजाण ॥ अवघे बुधजन समजती तया केवळची पाषाण ॥ ध्रु– ॥

पद ७ वें. ( केरव्याचे चा० )

**गरीबलोकः**–सकल जगाचे जीवन दात्या येई झडकरि करुणवना ॥ अखिल सृष्टि सौंदर्य निधाना करि रे आगमना ॥ मेघादे जीवन आह्मा ॥ ध्रु० ॥ तुजवर आमुची मदार सारी ॥ भिक्षा मागतसों तव द्वारीं ॥ हकलुनि देउं नको दे वारी ॥ झडकरि सुखकारी ॥ मेघा ॥ ध्रु ॥ या कालानें 'आ' पसरीला ॥ वदनीं घेई बलि सकलाला ॥

कोणि कुणाला मुळिं न विचारी ॥ सूज्ञ जाहले अवचारी ॥ दे जीवन ॥ ध्रु० ॥ पाण्या वांचुनि नुसती माती ॥ कोठुनि अन्ना देइल जगतीं ॥ संबंधा वांचुनी होईल कैशी फलप्राप्ति ॥ ध्रु० ॥

पद ८ वें. ( कटाव )

**भिकारी**:--दुष्काळ भयंकर आला ॥ गांजितो सकल लोकांला ॥ पडलें आवर्षण भूवरती ॥ क्षुधितांचे बहु हाल होती ॥ अन्नजल तयां कोणी न देती ॥ भूतदयेची झाली माती ॥ कोणी कोणा नच ओळखती ॥ दुर्बलाना कोणि न पुसती ॥ वाढली प्रबलांची कीं महती ॥ श्रीमंतांना लुटारु लुटती द्रव्य लुटूनी फस्त करिती ॥ सुखें कोणा खाउं न देती ॥ ग्रास मुखींचा काढुनि घेती ॥ राजरोस हे सकळां छळिती ॥ राजभय न त्या वाटे चित्तीं ॥ रस्तोरस्तीं खून पडती ॥ लोपुनि गेली सुधर्म नीति ॥ त्रस्त जाहले जन भूवरती ॥ ऐषआरामीं निमग्न भूपति ॥ म्हणुनी लोपुनि गेली मीती ॥ पुण्याईची परि समाप्ती ॥ केली पापानें भूवरती ॥ इतुक्या मध्यें रोगराईचें ॥ झालें साम्राज्य सुरू साचें ॥ घेउं लागली बलि सर्वांचे ॥ उपाय थकले कीं वैद्याचे ॥ खेळ असती हे देवाजीचे ॥ पुढती त्या चाले न कुणाचें ॥ उरले सुरले त्यांनीं आतां ॥ शरण री-

[library stamp]

घावें श्रीभगवंता ॥ हरण करील सकलांची चिंता॥ विसरुनि प्रभुला गेला होता॥ फळ त्याचेंहें घडलें आंता ॥ देवभूवरि करील सुबत्ता ॥ याविश्वावर त्याची सत्ता ॥ कोणा नकळे त्याचा पत्ता ॥ प्रेमें जो स्तवितो ॥ तयाचा प्रभू दास होतो ॥ध्रु

पद ९ वें. ( सतीस दैवत या जगतीं या चा० )

**भिकारी**–जनावरांचा हंबरडा ॥ ऐकती न जे त्यावरी अंतीं फिरेल कालाचा दंडा ॥ ध्रु० ॥ दुष्ट कसाई चरचर माना ॥ चिरती त्याकडे कोणी बघेना ॥ दुर्दशा बघुनी नयनीं ॥ करुणा अजुनी ॥ नच ये सुजनीं ॥ जीवनार्थ कल हें अकारण करिती आपसामधिं झगडा ॥ ध्रु० ॥

पद १० वें. ( साध्य नसे मुनि कन्या या चा० )

**दयासागरः**–झिजविन ही मी काया ॥ दीन जनांचें हित साधाया ॥ ध्रु० ॥ याचक न करीं अक्षय दाता ॥ करिरे मजला श्री भगवंता ॥ विनती तव चरणीं या ॥ करुनि मागतों वर दाना या ॥ ध्रु० ॥ अमोल्य नरतनू पुण्याईनें ॥ लाभ तसे ही ईश दयेनें ॥ नीति धर्माभिरुची ॥ अक्षय राहोंदे अंतरिंया ॥ ध्रु० ॥ भूत दयाही भूषण मनुजा ॥ आहे केवळ जगतीं समजा ॥ अपपर भेद न माना ॥ एका मातीच्या प्रतिमा या ॥ ध्रु० ॥

पद ११ वे ( श्रीरामपदें उद्धारिली या चा० )

**विश्वरूप राजाः**—अज्ञान तमांतुनि मला तूच मुक्त केलें ॥ नेत्र खुलुनि गेले ॥ चित्त शुद्ध झालें ॥ ॥ ध्रु० ॥ राज मदें नीति धर्म ॥ त्यजुनीया आत्मकर्म ॥ आजवरी पशु समान वर्तन मी केलें ॥ ध्रु० ॥ निस्पृहसा मित्र खरा ॥ दिधलासी ईशवरा ॥ उपकृति तव न फिटे कधीं कांहीं जरी केलें ॥ ध्रु० ॥

पद १२ वें. ( ग म प ध नी धप या चा० )

**विश्वरूप राजाः**—अतिशय कठोर मम अधिकारी पाहे ॥ प्रिय स्वजन हनन करितात महीवरी । दया न मनांत तिळभरी ॥ ध्रु० ॥ हयगय उपयोगी मुळी यांची आतां न **करुनि** तिळभरि करुनि जनीं लौकिकास माझ्या ॥ कलंकाचि लाउनी ॥ प्रिय बांधवा । नृपपद महती झणि जाईल कीं बघ लया ॥ राज्यक्रांती होईलचि सत्वरी ॥ ध्रु० ॥

पद १३ वें ( काय परम रमणीय या चा० )

**दयासागरः**—नृपमन कोमल राहु सदोदित जन हित साधाया ॥ हीच विनंती तव पद कमलीं माझी शिवराया ॥ राष्ट्रावरती सत्ता भानू राहो अक्षयिया ॥ राज्यक्रांती कधिनच होवो आशा

सं. काव्य २०८



अंतरिंया ॥ सकल जन मनीं नांदो ईशा पूर्णा-
युष दे नृपती राया ॥ ध्रु० ॥

पद १४ वें. ( अवदसे लागले पिसे या चा० )

**सत्वदर्शनः**–याचना करी निशिदिनीं मानवाचिया मानहानी ॥ ह्मणुनि हें जगत अवमानी ॥ फिरविते सतत याचकां शांति मुळिं न दे पहा सदनीं ॥ अब्रुची करुनि धुळदाणी ॥ देती न मान कुणि जनीं ॥ परि कटू शब्द बोलोनी ॥ टाकिती हृदय भेदोनी ॥ जगतिंया असति बहु धनी ॥ परि पईन देति उचलोनी ॥ भांडार भरति निशिदिनीं ॥ सोडीव याचनेंतुनी ॥ ईश्वरा झणीं ॥ विनाति ऐकोनी ॥ नातरी धाड यम सदनीं ॥ ध्रु० ॥

पद १५ वें ( प्रीति उदधि भरती या चा० )

**महानंदाः**–श्रीमंतीहुनि गारिबी फार चांगली ॥ विभवाची या खचित प्रियाही क्षणैक आहे साउली ॥ ध्रु० ॥ थारा दे तव चरणीं सद्गुरु माउली ॥ परिणामीं या द्रव्याचा मद नरकिं मनुजा लोटुनि दे ॥ पति सेवेविण मुळिंनच सुगति ॥ या भूवरती कधिं चिरकालीं ॥ देवा देई ठाव ॥ कलिमल निरसन झडकरि करुनि ॥ ध्रु० ॥

पद १६ वें. ( सकल सुखाचें आगर या चा० )

**सत्यदर्शनः**—सलिला वांचुनी सुकुनी जाते कमलिनि ज्यापरि प्रिय युवती ॥ दुःस्सह दुःखानलिं पोळविसी कोमल काया कां सुमती ॥ झंजावातें ज्या परि उपवनीं रंभा उलथुनिया पडती ॥ त्यापरि होइलगत तव सखये कधींना कधीं या जगतीं ॥ सुंदर मुख चंद्रमा तुझा हा तेज रहित होइल सुदती ॥ ह्मणुनि सांगतो जनक सदनिं जा अत्यानंदें प्रिय युवती ॥ ध्रु० ॥

पद १७ वें. ( तुम्हि प्राणाहुनि मला या चा० )

**महानंदाः**—अर्धांगी आपुली ॥ ज्या दिवसापासुनी जाहले तधिं काया अर्पिली ॥ ध्रु० ॥ या देहावर माझी सत्ता ॥ उरली नाहीं ह्मणुनी चिंता॥ करूं कशाला व्यर्थचि आतां ॥ सर्वस्वी मी कांतअंकिता ॥ कन्यादाना करुनी जनकें जन्माची दीधली ॥ ध्रु० ॥

पद १८ वें. ( लेश मात्र मजशक्ति या चा० )

**सत्वदर्शनः**—अस्तिचर्माचे अनंत पंजर निर्मित करुनि विधिराया ॥ आत्मारामारूपिं ठेविले कीर त्या मध्यें जगतींया ॥ अनंत घटजारि घडाविसी देवा एक मातीच्या प्रतिमाया ॥ घडामोड तू करिसि सदोदित अघटित आहे तव माया ॥ अनंत कोटि ब्रह्मांडाचा चालक सर्वांवरि माया॥

एक सारखी ठेविती परि लाभे कर्मापरि
काया ॥ ध्रु० ॥

पद १९ वें. ( मी झाडामंदी झाड पाहिलं या चा० )

**महारः**—पैक्या पाई समदी दुनिया लइ पातक कर-
तिया ॥ गरिबाकड कुनी पाहिना जो त्यो डाव
साधुतया ॥ बाग बगीच वाड्या वतन गरिबा
नाडूनिया ॥ घेउनश्येनी राजावानी इलास
भोगावया ॥ गुराढोराची किरसानाची
कुनांस येइना दया ॥ ह्मनुन कोपला मेघराजा
समद्यासनी माराया ॥ पातकाला ठावा नाहीं
धरनी कापतिया ॥ देवावरती बोल कशाला
उगाच ठेवताया ॥ ध्रु० ॥

पद २० वें. ( झंपा )

**दयासागरः**—अंबर स्यंदना चपल मारुत तुरग जुंपुनि
सुविद्युध्वज फडकवीला ॥ मेघराजा निघे बैसु-
नी अंतरीं शांति द्याया पहाया क्षितीला ॥ बा
प्रखर तापारिनें शीण बहु दीधला ॥ बहुत
दिवसावरी वसुमतिला ॥ धड धडा रथ पहा
आक्रमण करुनिया ॥ गडगडाट स्वनें गर्जुनीया
सलिल शर वर्षुनी ताप अरिला क्षणें साहजिक
जिंकुनी विजयि झाला ॥ ध्रु० ॥

पद २१ वें. ( मणीयुक्त सिंहासनी या चा० )

**चिदानंदयोगीः**—प्रजा रक्षणीं दक्ष जो भूप राहे ॥

तयाला जगीं न्यून कांहीं न पाहे ॥ जयाचे शिरीं विष्णुचा हात आहे ॥ तयाचा प्रभूदास होवोनि राहे ॥ जयाचे मनीं नांदतो चक्रपाणी॥ तिथें राहत सर्वदा पीकपार्णी ॥ खरी मान ही भूपती शुद्धवाणी ॥ तुझ्या कीर्तिची लोक गातील गाणीं ॥ ध्रु० ॥

पद २२ वें ( राग मेघ त्रिताल )

**दयासागर**:-नीतिस अनुसरुनी क्षिति पतिजो । स्वजन अवन करी जगतीं तोच प्रभुला होतो खचिताचि मान्य ॥ ध्रु० ॥ नृपाति पदाचा सदुपयोग जो करितो त्याचा जयजयकार ॥ क्षितिवारि होउनिया सन्मान ॥ मिळवी कीर्ति उदंड ॥ ध्रु० ॥

( पहिला अंक समाप्त. )

# अंक २ रा.

पद १ लें ( इसतन धनकी या चा० )

**चिदानंद**:-भूजल तेज गगन समीरण पंचतत्वाचीमानव काया ॥ निर्मित केलीस भो विधिराया ॥ कौतुक वाटे अवलोकुनिया ॥ देह मंदिरीं जीवन माया॥ स्थापन केलिस खेळ कराया ॥ दश इंद्रिय पती

नां. काव्य २०२



मानस राया ॥ करवि चालविसी सुयंत्र काया ॥ ज्ञान विवेका दोघांनांया ॥ सुमंत्रि दिधले साह्य कराया ॥ शब्द स्पर्श रस गंधादिक क्रिया ॥ चालविताती पूर्ण पणें या ॥ मायेविण हें जीवन वांया ॥ भूतलीं असे कीं नांदाया ॥ जिवा शिवाच्या मैत्रीवरिया ॥ राहे अवलंबुन ही काया जेव्हां दोघे जाति निघुनिया ॥ तेव्हां होते मृन्मय काया ॥ धृ ॥

पद. २ रें (प्रभुतू संसारीं संसारीं या चा०

**चिदानंद**–मीतर बेगारी बेगारी ॥ सद्गुरु तुझिया द्वारीं ॥ ध्रु०॥ सकल जगाचें सूत्र तव करीं चलन देउनी सारिं ॥ मानवादि बाहुलीं नाचविसी स्वेच्छेनें संसारीं ॥ ध्रु० ॥ आप्त इष्ट गणगोत अमुचा तूच असिस श्रीहरी ॥ अक्षय आनंदाचें आगर मधुर नाम सुखकारी ॥ ध्रु० ॥ अहर्निशीं तवध्यान मनोहर भवोदधितुनि पारकरी ॥ त्वद्गुण संकीर्तना वांचुनी सौख्य नसे तिळभरी ॥ ध्रु० ॥

पद ३ रें ( आजमोरी अँखियाँ या चा० )

प्रेमरूप जगत मनुजा असे ॥ अणु रेणुंत सत्य नित्य करित संचार ॥ नच यासी मुळिरे किमपि विसावा ॥ ईश्वर चराचरीं वसे ॥ ध्रु० ॥ अभेद्य आहे भूतलावरी ॥ आदिअंत या किमपि न मनुजा ॥ सत्प्रेमास पारावर मुळिंच नसे ॥धृ०॥

## गुरुप्रसाद.

सोड धनागमही तृष्णा ॥ तनुमन बुद्धि तृष्णा
जोडुनि शांति सुख सेवी ॥ धृ० ॥ जें तुज लाभे
कष्टानें धन तुष्ट तयांतचि होई ॥ वनिता दुहिता
इष्ट सोयरे सुत तव कोणी नाहीं ॥ आलासि
कोठुनि मूढ नरा तू तत्व शोधुनी पाही ॥ नकरी
जनिधन यौवन गर्वा काळ गिळिल लवलाही ॥
माया मय हें जाणुनि झडकरि ब्रह्मपदातें जाई॥
कमल दलीं जल बिन्दू अस्थिर त्यापरिभव पाही॥
सत्संगति धरुनी मनुजा ॥ अतितर दुस्तर भव-
सागर हा पारतरुनि जाई ॥ १ ॥ जन्मा आधीं
प्राण्याचें या शयन मरण जननि उदरीं ॥ दोष
समजुनी तोष अंतरीं मानुनको संसारीं ॥ अव्या-
हत बा षड्ऋतुचें या चक्र आक्रमणकरी ॥
नियमानें यमहरितो आयू आशापाश झडकरी
नाश करुनियां लोटुनी देइल तुजला नरक द्वारीं॥
कृतांत कटकाऽमलध्वजजरा फडकूं लागली शीरीं॥
सत्संगति ॥ २ ॥ बाल पणामधिं खेळ खेळुनी
यौवनिं विषयीं दंग ॥ होउनि वार्धक्यांत बावळा
परिन सोडीसी ढंग ॥ मानव जन्मीं बुद्धिज्ञानें
संतत करि सत्संग ॥ आधिव्याधि भुजंग दशें
मुकशिलं सौख्य अभंग ॥ भरलासे सर्वांतर्यामीं
एकाचि बघ श्रीरंग ॥ सत्संगति ॥ ३ ॥ दर्शन

विहिनतववदन होउनी अंग गलित झालें ॥ दंड
घेसी करिं परि आशेच्या भारें वाकविलें ॥
साठी बुद्धि होउनि नाटी मर्कट रूपा धरिलें ॥
अहंकार भोंवऱ्यामधें तव मन अजुनी गुंतलें ॥
फुका मुक्तिला मुकुनि जाशिल आशेच्या मृगजळें॥
सत्संगति ॥ ४ ॥ प्रपंच साधुनि अपपर भेदा
भेद झणीं तोडी ॥ सर्वांभूतीं समबुद्धितें ठेवुनि
मुक्ति जोडी ॥ नश्वर जगहें मानुनि अवधें शोक
सर्व सोडी ॥ माझें अमकें माझें तमकें याची
धरिन आवडी ॥ श्रीरंगाच्या भक्ति रंगणीं
रंगुनि सेवी गोडी ॥ सत्संगति ॥ ५ ॥

पद ४ थें. ( दिंडी. )

**चिदानंद**—गगनिं विलसे औषधी पती जैसा ॥ गमे दाता
हा मजसिं पहा तैसा ॥ ऋषी सरिखी शोभते रम्य
कांती ॥ नयनिं यई पाहुनी यास शांती ॥धृ०॥

लावणी.

**धर्माजी**—कर्नावानी उदार असुनशान मनगंगावानी ॥
दुबळ्याचा कैवारी हाइ बगा दयाळु माझा धनी॥
लाखू पतिची साउकारी गरजू येउंदे कुनी ॥
छन् छन् छन् छन् रुपये त्येला देती मोजुन श्यानी॥
फिर्यादीचं नांव नाहीं धनि माझा बहुगुनी ॥
लहान मोठ समद सारख भ्येदा भेद न मनीं ॥
मार्कंड्याच आउक्ष देवा देइधन्याला जनीं॥परा-

र्थना तुज करितो देवा हात जोडुनश्यानी॥धृ०॥

पद ५ वें. ( एजी भला या चा० )

**अनिरुद्ध**-निराकारा साकारत्व बघ देसी कासया ॥ कितीहें अज्ञान ॥ धृ० ॥ ईश तुझा कोणासी दिसेना सदुपदेश तुज करुनि व्यर्थ मम मनास होई शीणया ॥ ध्रु० ॥

पद ६ वें.

**पद्मावती**-जगदीश्वर सर्वत्र भरला ॥ चरा चरांसी व्यापुनि उरला ॥ विश्वास ठेवितो त्यासी घडि घडी दिसत नयनांसी ॥ नास्तिका नदिसे ॥ जलतृण काष्ठासि व्यापुनि उरला ॥ ईश्वर० ॥ अणुरेणू तया ॥ वास करुनिया ॥ सर्वांवर दया असुनीया ॥ गुणमहत्व वर्णायाला ॥ नागेंद्र चकितचि झाला ॥ मूढमती आह्मीं सर्व आहों पहाच खरें ॥ नच विसरावें प्रभुला ॥ ध्रु० ॥

पद ७ वें.

**अनिरुद्धः**-किती वेड्या युवति असति या समजुत करवेना कुणा ॥ ध्रु० ॥ पालथ्या घड्यावरती पाणी ओतुनि नच उपयोगी ॥ बधिरा पुढती वाचुनि गीता व्यर्थ खर्चिलें ज्ञाना ॥ नैसर्गिकही प्रचंड शक्ति ब्रह्मांडीं भरलीसे ॥ उत्पत्तिस्थिति लयास कारण स्वयंभु तत्वचि जाणा ॥ ध्रु ॥

ईश्वरतो बघ कोणी नाहिंच पाखांडीमतटाकी॥ सदसद्विवेक जागृत ठेवुनि राखी आपुला बाणा ॥ ध्रु० ॥

पद ८ वें.

**पद्मावती**–संत येती ज्याचे घरीं ॥ त्याचि पीडा होय दुरी ॥ संतत लोभकरी त्रिपुरारी॥सणदिपवाळी दसरा सुखकर कधि नच येती वारंवार॥ दर्शनें पूर्ण हेत ॥ जाहले अवचित ॥ सुकृतासी नुरला पारावार ॥ पावन करुनी दीन सुतेचा केला संतानीं उद्धार ॥ध्रु०॥

पद ९ वें. ( नैन कौसल्याजिको या चा० )

**पद्मावती**–कोप नकरा महाभागा ॥ पतिवरती ॥ सतत चरणा वंदुनी मागते ॥ सत्संग द्यावा अभंगा ॥ ध्रु० ॥ कांत समागम अक्षय सेवुनी अंतीं दे थारा श्रीरंगा ॥ ध्रु० ॥

पद १० वें. ( अभंगाच्या चालीवर. )

**पद्मावती**–परमेशाहुनी ॥ साधुसंतथोर ॥ असतिभूवर ॥ खरोखर ॥ दर्शन घडतां पतिततरती॥ सद्गुण गावे वारंवार ॥ उलटा पालट करिति क्षणांत ॥ ऐसें हें सामर्थ्य दृग्गोचर ॥ कन्येवरीदया ॥ असावी सदया ॥ याहुनि न आशा खरोखर ॥ दर्शनें उद्धार ॥ करिती सत्वर ॥ हे चिविश्वंभर ॥ जगावर ॥ दर्शनें पूनित ॥ झाले-

अवचित ॥ माझे गणगोत ॥ तव किंकर ॥
होउनीयारत ॥ जाउंतसतत ॥ भूवरिनांदोत ॥
विश्वंभर ॥ ध्रु० ॥

साकी ११ वी.

**चिदानंद**–परमात्म्याच्या पूर्णदयेची छाया तुजवरि
विलसे ॥ त्वपुण्याई वर्णायाला कुंठित मति
होत असे ॥ सतिचें दर्शन तें ॥ दुरिता नेई
विलयातें ॥ ध्रु० ॥

पद १२ वें. ( रतहारिपद कमलकंद )

**दयासागर**–निशिदिनिं मनिं झुरुनि झुरुनि शिणवुं
नका काया ॥ न्यून तुम्हा कांहिं नसे महिव-
रती ताता ॥ रामनाम भजनकरा शांति मना
घ्याया ॥ ध्रु० ॥ सेवेला सादर मी नित्य
असुनीया ॥ मन उदास ठेउं नका ईश्वर गुण
गाया ॥ ध्रु० ॥

पद १३ वें. ( राग देश ताल दादरा )

**चिदानंद**–पुण्यवान धर्मात्मा शांति दे मनाया ॥
कर्णापरि तू उदार अससि महिवरीया ॥ ध्रु०॥
पितृभक्त सुंदर सुत ॥ पद्मावतिमूर्तिमंत ॥
सुव्रता असे जगांत कुलज उद्धराया ॥ ध्रु० ॥
स्वामिनिष्ट सेवकजन ॥ शुश्रुषेस करजोडुन ॥
असुनीया रात्रंदिन ॥ करिशी तू ईशभजन ॥
भूवैकुंठचि सदन गमतसे मना या ॥ ध्रु० ॥

पद १४ वें. ( मजला वरिल सुभद्रा काय या चा० )

**चिद्रानंद**–शिव शिव गिरजाधव भोला ॥ कठिण समय आला ॥ ध्रु० ॥ अभद्रवाणी उच्चाराया ॥ आलें माझ्या नशिबीं या ॥ न धजे रसना बोलाया ॥ ओढे आंत काय करूं ॥ ध्रु० ॥ माझें भविष्य या पुरुषास ॥ लोटिल दुःखानलिं खास ॥ दुःखा देतेजी आत्म्यास ॥ विद्या ती गुप्तचि होवो ॥ ध्रु० ॥

पद १५ वें. ( गरजत बरसत या चा० )

**चिदानंद**–निशिदिनिं चिंता अंतरिं नकरी ॥ ईश्वर तुजवरि खचितचि ठेविल ममता ॥ हरिस्मरणकरी ॥ कर्मापुढती गती कुणाची ॥ चालत नाहीं वैखरिसाची ॥ यास्तव मानुनि शांती हृदयीं अहर्निश धैर्य धरी ॥ ध्रु० ॥

साकी १६.

**चंद्रशेखर**–अवचित मजला ईश भेटला आज अनायासानें ॥

**चिदानंद**–तुझ्या दर्शनें प्रमुदित झालों श्रीजगदीश दयेनें ॥ कलिमलअंतरिंचा ॥ गेला आज लयासाचा ॥ ध्रु० ॥

( अंक दुसरा समाप्त. )

# अंक ३ रा.

पद १ लें. ( लाल शालजोडी या चा० )

**दामोदरदीक्षित**—दृढनिश्चय गंभीर **मनाचा** शहाणा मधुर बोलका सुगुणनिधी ॥ सत्यवादि निर्भीड ज्ञानी विश्वासू विद्वान् सुधी ॥ लोकप्रिय नयनीति विशारद धार्मिक सुविचारी संधी ॥ येइल तैसें वर्तन ठेवी महाधोरणी मुत्सद्दी ॥ बहुश्रुतसा स्वार्थ त्यागी चतुर रसिक शांती उदधी ॥ असापुढारी शुद्धमनानें स्वदेश कार्यातें साधी ॥ ध्रु० ॥

पद २ रें. ( अवनिपतिस न्यून या चा० )

**बाळशास्त्री**—जोडावें परमार्था स्वार्थ साधुनी ॥ तळतळाट देत असे नरकिं लोटुनी ॥ध्रु०॥ समाधान हीच असे मुख्य संपदा ॥ द्रव्य लोभ देत असे अंति आपदा ॥ वित्त पहा प्रखर गरल असुनि हें सदा ॥ अंधकरी सकल जनां मोह घालुनी ॥ध्रु०

पद ३ रें. ( एरिए मैका या चा० )

**दयासागर**—दिनमणि अस्ताजात असे हा शांति देतसे किति मन्नयना॥परि अंतरिंया चैन पडेना सोसवेन सन्मित्र विरहहा ॥ ध्रु० ॥ सरिता तट किती सुरम्य भासे ॥ संध्यावंदन करीरमणिय द्विजगण मद्दुरिताचें क्षालन करूं हा ॥ध्रु०

पद ४ थें. ( नाचे गाहो नारी या चा. )

**सखीगण**—त्रिनयन विश्वनाथ भोला ॥ स्मरारिशिवा चंद्र शेखरारे सुरनाथा त्रिपुरारी॥स्मरारि॥ध्रु०॥ भक्तकाम कल्पतरो तारी दयाळा ॥ भवसिंधूतूनी निवारी ॥ त्वंन्नाम सुधाधारा करील शांत॥ निराकार । निराधार । गाउंत तुझिया नामासी शंकरारे ॥ त्रिनयन ॥ ध्रु० ॥

पद ५ वें. ( तेरि मेरी जोडी बनी या चा० )

**सखीगण** झडकरि चला घरीं ॥ सासुबाईकरितिल जाच ॥ ध्रु० ॥ दीरनणंदा मिजासि भारी ॥ छळिती आम्हां अहर्निशिया ॥ चाल ॥ जयगौरीहरा ॥ जयविश्वंभरा ॥ देई ठावा तुझ्या चरणिंया ॥ जन मनोहरा ॥ प्रिय उमावरा ॥ झणिं तारी शिवा दुहिताया ॥ हे देवा ॥ त्वत्पदपंकजिं देउनिवास ॥ मनिंचीआस ॥ पुरवी खास ॥ ध्रु ० ॥

पद ६ वें. ( गोपिचंद मैनावती या चा० )

**सखीगण**—पतिसेवा युवतिस जगींया ॥ व्रत हेंच पावन करितेया ॥ सतिविण वसुमति चालेना गृह देवतांसी न अवमाना ॥ पतिलागिशंकर मानावा ॥ अहर्निशिं रतव्हा सुखद्याया ॥ प्रियकर बंधुस विनतीया॥करुनी सदनासी जाऊया॥

सदाशिव भजना नित गाया ॥ सुमती देई अब-
लानां या ॥ ध्रु० ॥

पद ७ वें ( जानीसून या चा० )

**दयासागर**–मन सांत्वन करी किती शशिवदनी ॥ नवतरुणी ॥ प्रियरमणी दे शांति जिवास क्षणांत सुगुणवंती ॥ ध्रु० ॥ विधिकर इस घडवीतां निशिदिनिं श्रांत झाला ॥ स्वरूप संपन्न इन सम आहे कोण ॥ हा जीव तुजवरि बघ ओवाळुनि टाकीन रमणी ॥ ध्रु० ॥

पद ८ वें. ( बिछवनकी झनकार या चा० )

**दयासागर**–चपलेपरि चपलाई करुनि झणीं गेली गेली कीं सखि आज ॥ नभिंशशांक सुंदरि मुख-कमल अवलोकुंनिधरिलाज ॥ करुनि ॥ निमिष मात्र रमणीचा समागम घडला नच मज आज ॥ करुनि ॥ मांत्रिकापरी भारुनियां मज गेली सुंदरि आज ॥ करुनि० ॥

पद ९ वें. ( कोनदिला राम या चा० )

**दयासागरः**–अंतरिया राम नसे रामावसे ॥ तिनें नादान मज केलें असे ॥ ध्रु० ॥ अशन शयन तें मुळिंच रुचेना ॥ मच्चित्त तद्रूपीं ॥ तल्लिन होवोनी ॥ गेलेंकी मोहूनी ॥ जादूची मोहनी वेधितसे ॥ ॥ मन वेधीतसे ॥ ध्रु० ॥

८२
दा. क्र.
शाखा



पद १० वें. ( चकमा चलता या चा० )

**दयासागरः**–मदना कुटिला छळिसी मजला ठेवुनी या मजवर नक्षा ॥ दुरिता चरणालावुनि मजला पुण्यांशाची केलिस रक्षा ॥ त्वां केलिस मजला जिंकुन ॥ हें दुश्चिन्हचि जगतांतुन॥ नरकीं मजला लोटुनि देइल पुण्यांशाची झाली रक्षा ॥ ध्रु० ॥

पद ११ वें. ( सखे कैसे समजाउँ या चा० )

**महानंदाः**–सखे गडे दुःख साहूं कैसे ॥ प्रियपति विण करमत नाहीं ॥ माझें हृदय सतत उलतें गे ॥ ध्रु० ॥ विरहानलिंया जळुनिया स्वमना॥ शांति बघ तिळभरि मिळत नसे ॥ कांत वदन चंद्रमा तो पाहिन कधीं गे ॥ सखे कैसे धारि मनधीरधरीं मन धीर गे ॥ तिळभर मजसी चैन पडत नसेगे ॥ चित्त किती हें बघ खुळे गे जाहलें माझें ॥ हें चंचल मानस न आंवरे ॥

पद १२ वें. ( करनजर मुझपर या चा० )

**महानंदाः**–अंतरीं शांति न रात्रं दिसा ॥ मज्जीव वेडा ॥ होई असा कां ॥ हाय ! करूं मी काय ! हाय ! संभाळ ! संभाळ ! संभाळ ! जय जय गौरी हरा ॥ जय जय विश्वंभरा ॥ भो त्रिपुरारी ॥ मद्रक्षण करुनि संकट निवार ॥ कन्येचें सांत्वन कराया सत्वरी ॥ धांऊ-नये ॥ ध्रु० ॥

पद १३ वें. ( नेक नजर मोरा मन वश या चा० )

**सत्वदर्शनः**—मत्सकल हेत ईश दयें सफल झाले ॥ आली शांति जिवा ॥ हें आनंदित मन होउनिया ॥ बहुतचि धालें ॥ ध्रु० ॥ सदैव मम मनिं ईशा ठेविं सुख शांती ॥ तव पदिं विनति असे ही तव कृपेनें मजसी प्रवासा सुयश आलें ॥ ध्रु० ॥

पद १४ वें. ( श्रुति वचन कधिं नच या चा० )

**सत्वदर्शनः**—शशि वदनी ही युवती जगतिंया लाभलीसे ॥ भाग्य माझें ह्मणुनिया ॥ मम आज्ञेतें दैवत मानुनि ॥ घेते शांति ही दिन रजनीं ॥ वर्णाया गुण प्रियकरीचे ॥ मन्मती शक्य नोहे ॥ ध्रु० ॥ सगुण खनीचा वास ज्या स्थलीं लक्ष्मी नांदतसे चिरकालीं ॥ सुखदायिनी सुगृहिणी लोकीं पतिला तोषवितीया ॥

पद १५ वें. ( मन माझें चोरिलें या चा० )

**महानंदाः**—श्री तुलसी पूजनीं सुमनारत हो ॥ ध्रु ॥ कमल नयन मधुसूदन धारि शिरिं आनंदें तुज जनीं ॥ पातिव्रत्य सुधर्माभिरुची ॥ होवो वृद्धिंगत अंतरिंची ॥ आदिशक्तिमाते मातें करि रत गे चिंतनीं ॥ ध्रु० ॥

( अंक तिसरा समाप्त )

## अंक ४ चौथा.

**दयासागरः**—" अंतरिया रामनसे " (पूर्वोक्त ह्मणतो.)

पद १ लें. ( तव तूतोराम सुमर या चा० )

**सत्वदर्शनः**—तव कांती विमल किति होती ॥ कोमल काया करपुनि गेली लागुनि अवचित क्षय हे सुमती ॥ ध्रु० ॥ हृद्रोगानें देह जाळुनी ॥ टाकुनि दिधलिस कशि सुख शांती ॥ ध्रु० ॥ मित्र संकटा हरण कराया स्वदेह अर्पिन व सुमति वरती ॥ ध्रु० ॥

पद २ रें. ( चाल मृदु अंकावरी या चा० )

**सत्वदर्शनः**—हृद्गदहें लपवुनि या ॥ ठेविसि कारे वांया शिणवुंनको आत्म्याला विनाति असे सखया ॥ ॥ ध्रु० ॥ सुंदरशा तव देहा ॥ दुःख रूप कीटकहा ॥ कोरुनि टाकील पहा ॥ होइल अनुताप महा ॥ दुःखानल खाक करुनि टाकिल बघरे काया ॥ मनुज देह वरचेवारि मिळत नसे सखया ॥ ध्रु० ॥

पद ३ रें. ( पिया बन पर देसी छौंड चले या चा० )

**दयासागर**—जगदीश नाहीं अंतरिया ॥ अतिशय रमणिय नारि रूप मय जग मज सकलाची हें भासे ॥ सुखकर मुखचंद्रमा सखीचा नयना शांत करीना ॥ भूवरि या ॥ ध्रु० ॥ मखर मदन

शरसोसवे न मज तिळभर चैन न पडुनी दे ॥ रामबाण औषधी मिळेना ॥ दमलो फार सुमित्रा शोधोनिया ॥ ध्रु० ॥

पद ४ थें. ( धीर धरी मनाकां या चा० )

**सत्वदर्शनः**--मन आधिन तोंवरींया समजा ॥ चालतार्ता निशिदिनीं या मौजा ॥ ध्रु० ॥ कोमल काया जाळिल चिंता ह्मणि निःसत्व करिलचि मन राजा ॥ ध्रु० ॥ वर्म प्रबलाचे असतेंकीं ॥ अति शयीत नाजुक मनिं उमजा ॥ ध्रु० ॥ चाल ॥ प्रिय मित्रा तव हेतपहा करिन सफल सारे ॥ निरसन मी करिन तुझें दुःख त्वरित बारे ॥ हा अर्पिन देहमी तव काजा ॥ ध्रु० ॥

पद ५ वें. ( सति सुंदरि या चा० )

**दयासागरः**--गुण सुंदरी सुकुमारी ॥ प्रियगुण० ॥ या हृदयिं रमे प्रियनारी रमे प्रियनारी ॥गुण०॥ध्रु०॥ वदन शशीचें दर्शन झालें बहु सुखकारी ॥ गुण० ॥ अशी सुगुण खनी ॥ नसे जगतिं कुणी ॥ मित्रा खचित मनीं ॥ गमे रंभाच दुसरी ॥ सती असली जरी ॥ पहा मदन अरी ॥ मना मोहित करी ॥ किर्ती दुष्टतरी ॥ शरम न काशीयासी मुळिंबघ तिळभरी ॥ तिच्याविना ॥ नसेपहा ॥ शांतीजिवा ॥ करूं कसें ॥ धीरनसे ॥ झालें हंसें ॥ खरोखरी ॥ गुण० ॥ ध्रु० ॥

42



पद ६ वें. दिंडी.

**सत्वदर्शन**–जन्म सार्थकता करुनि मनो भावें ॥ कीर्ति रूपानें जनीं अमर व्हावें ॥ लक्ष चौऱ्याशी जन्म घेउनीया ॥ मानवाची लाभते रम्य काया॥ध्रु०॥

पद ७ वें ( तोरी सँावरी सुरत या चा०

**सत्वदर्शन**–धरिशांती सुमित्रा अंतरीं ॥ सुविचारें॥तव मनोरथ सफल मी करीनचि सारे ॥ध्रु०॥चिंता-वन्ही जाळिल देहा॥मद्वचनी विश्वास धरीरे ॥ ध्रु०

पद ८ वें. ( साकी )

**सत्वदर्शन**–भगीरथानें महा प्रयतें त्यापरि जन्हु सुतेला ॥ भूतलावरी आणिली त्यापरी त्वज्जीवन सरितेला ॥ शोधुनि प्रिय सखया ॥ अर्पिन तुजला सुखव्हाया ॥ ध्रु० ॥

पद ९ वें ( रे जाई तूं शरण या चा० )

**दयासागर**–ये शांती तव वचन श्रवण करुनिया ॥ प्रेम रूप जलनिधीस ॥ भरति येउनि जिवास ॥ अपर-मित आली शांतता पहा मनीं ॥ अमृत वर्षाव करुनि हृद्रोग सांत्वन केलसी तू.॥ प्रियकर मित्र सखा तुजविण नाहिं दुजा ॥ तुजवर प्राण ओवाळुनिटाकूं ॥ ऋणी मज केलें खचित जगीं या ॥ ध्रु० ॥

पद १० वें ( आजितोरा सैयाँ मँदरवा या चा० )

**महानंदा**–कांत मन झालें उदासीन निद्रा मुळिंनये ॥

अन्न तयाना गोड नच लागे ॥ गोडशब्द बोलतीन ॥
सौख्य लेश नच जिवास ॥ मत्प्राण संजीवनासी
सुखी ठेव सर्वस्वि माझा तुझ्या ठायीं सद्भाव ॥
गिरिजा कांता कन्या पदरिंचे ॥ ध्रु० ॥

पद ११ वें ( नासुजनाये वचना या चा० )

**महानंदा**–जागे करूं कागे प्रिया धीर मज नसे ॥
बघवेनाही स्थिति मज करूं तरिकसे ॥
सखे करूंतसे ॥ ध्रु० ॥ कोण्यातरि सवतिनें
भारुनि टाकुनि मोह पाशि या सत्य जख
डिलें ॥ सोसुं कसें ॥ दुःख असे ॥ धीर मुळि
नसे ॥ ध्रु० ॥

पद १२ वें ( हो दई मारे या चा० )

हें मन बावरें होउनि गेलें कासया ॥ सुखा
गारा ॥ मनोहरा ॥ प्रियकरा ॥ धृ० ॥
दुश्चित्तेनें गांजियलें का दयाघना सांगा गडे मानसीं
श्रमूंनका सया ॥ ध्रु० ॥

पद १३ वें ( मन चंचल हें बहू या चा० )

रसना नधजे तिळभर प्रियकरी आत्मवृत्त मम
तुज सांगाया ॥ ध्रु० ॥ वज्र चूर्ण करी नगाशिं
खरातें ॥ त्यापरि ममवच तव हृदयातें ॥ भेदुनी
जातिलगे प्रिय सखये या समयीं ॥ हट्टन धरितू
प्रियतम युवती कटुतर वचना ऐका या ॥ ध्रु० ॥

पद १४ वें ( या करीमना या चा० )

**महानंदा**–या जिवावरी ॥ प्यारही खरी ॥ पंच प्राणा या पदीं वाहिलें ॥ मी खरें प्राण नाथ भूवरी ॥ ध्रु ॥ पति आज्ञा स्त्रियानां ॥ जिवा· हुनि प्यार आहेच दैवत नाहीं दुजें ॥ भिन्न भाव नसे ॥ एकमेका मधें ॥ या धरित्री-वरी ॥ ध्रु० ॥

पद १५ वें. ( कामशरें मन या चा० )

**महानंदा**–वामांगी मी तुमची असतांना शंकेस मनांत स्थल नच द्यावें ॥ युवतिस भूषण मुख्य असे कीं स्वपती पंचप्राण ॥ त्याविण कामिनी बिन कामाच्या असती शवाच समान ॥ शांतीचें मंदीर सर्वस्वी आपण आहात केवळ जाण ॥ हृद्गद सांगुनि झडकरि नाथा मन्मानस तुम्हि तृप्त करावें ॥ ध्रु० ॥

पद १६ वें ( जानकी अवन या चा० )

**महानंदा**–अंतरीं शंका न धरा ॥ मित्राचे हेत पूर्ण करा ॥ आयका विनतीला ॥ प्रेमखरें त्यास अर्पावें ॥ ध्रु० ॥ वचनभंग जो करील तो अधो-गतीस जाय ॥ मित्राचे० ॥ बेचाळीस कुळां उद्धरुनी मायेचा पाश ॥ जो तोडुनिया टाक-तसे तो होय शिवाचा दास ॥ ध्रु० ॥

पद १७ वें. ( कहुँक्यारे या चा० )

**सत्वदर्शन**–प्रेमाचा जय झाला ॥ तव शुद्ध प्रीति सरितेला ॥ पूरकीं आला ॥ ध्रु० ॥ चरित बघुनितव विबुध रसिकजन प्रमुदित होतिल गे विमले ॥ सुशिल युवति जनिं मिळुनि मजसि जनीं ॥ खचित स्वकुल मम उद्धारिलें ॥ धन्य धन्य जाहलों ॥

**महानंदा**–हें सारें तनुमन आहे कीं आपुलें ॥ पतिच्या मना सुख द्यावया अनुदिनिं राहिल दंग ॥ त्या युवती वरती दया सतत करी श्रीरंगा ॥

**ऋत्वदर्शन**–तुजसि मत्पुण्य अर्पियलें ॥ माझें जीवित सफल तू केलें ॥ शिवशंभो ॥ तुजसि देईल ॥ चिरकालीं सुगतीला ॥ प्रेमाचा ॥ ध्रु० ॥

पद १८ वें. ( मानवचन राजदुलारी या चा० )

**सत्वदर्शन**–सतिचरित शांति मनाला देते ॥ भवाब्धितुनी ॥ पारकरी झणीं ॥ निशिदिनिं सतत सुखाला दे ॥ ध्रु० ॥ श्रवण करुनि भक्तिरस परिपूरित भजन करीत जावें ॥ कलिमल निरसुनि सकलांला ॥ सुखदाई होतें ॥ ध्रु० ॥

( अंक चौथा समाप्त. )

## अंक पाँचवा.

पद १ लें. ( फुलवा बिनत डार डार या चा० )

**दयासागरः**—सतत छळित बेसुमार ॥ चैनन दे पडुनि मार ॥ चंद्र वदनि मन गुंगवी किती ॥ ध्रु०॥ वेडे हें मन उदास ॥ बनलें दासानुदास ॥ नाहीं मुळिं लाज यास ॥ भ्रमविते मती ॥ध्रु०॥ शांती या नच जिवास ॥ ग्रासिल कीं काल यास ॥ रमणीचा निदिध्यास ॥ लागला अती ॥॥ ध्रु०॥

पद २ रें. ( पति सेवा युवतिस या चा० )

**दयासागरः**—यावज्जीव जंतु वरतीया ॥ कारितो श्री जगदीश्वर माया ॥ प्रेममय जग मज भासतसे ब्रह्मांडीं या विण कांहीं नसे ॥ अघाटित ईश्वरी माया ॥ तर्क न चाले गुण वर्णाया ॥ ध्रु० ॥ नमन असो तुज सद्गुरुराया ॥ पदरीं घेई नत दासा या ॥ दुरित क्षालन करुनीया ॥ थारा देई नत दासा या ॥ ध्रु० ॥

पद ३ रें. ( जावदे लवादि या चा० )

**दयासागरः**—पत्रिके जीवन दिलें ॥ मित्रा प्रेम तव भरतिस किती आलें ॥ ध्रु० ॥ मदन विलास सुख घेईन मी परिपूर्ण ॥ दुःख सर्व मम शांत चि झालें ॥ स्मर खल अतिशय छळितसे

निशिदिनीं ॥ हृदयीं प्रखर शर अनिवार करित बेजार ॥ सखिमुखशशीहरो ताप ॥ ध्रु० ॥

पद ४ थें. ( जिअरवा धीरज धरो या चा० )

**महानंदा**:–प्रति रविहा गमतो खरा ॥ अति सुंदर स्वरूप क्षणीं या सुसमयीं दासीस पावन गुणा करा ॥ या जिवास मुक्त करा ॥ मनिंची आशा पूर्ण करोनी घ्यावी गुण गंभीरा ॥ तिळभर अंतरिं भीति न ठेवा मंदिरिं या नरवरा ॥ध्रु० ॥

पद ५ वें ( नशिबीं असें नचतें टळे या चा० )

**दयासागर**–रजनी पती गगनांतुनी ॥ इथँ अवचित कोठुनि पातला हें कसें नकळे मनीं ॥ ध्रु० ॥ जाह्नवि दुसरी भासतसे माझें मन धालें ॥ शांती देवी या समयीं नांदतसे सदनीं ॥ कलिमल निरसन झालें येथें सति मुख शशी अवलो-कुनी ॥ ध्रु० ॥

पद ६ वें. ( प्यारे तूं जानी या चा० )

**महानंदा**--संशय मनीं धरा ॥ निशिसारी मज संगें रमणिय सुसमयिं सुखोपभोगा ॥ ध्रु० ॥ तिळ-भर अंतरिं भीति न ठेवा ॥ लीन दासी सेवसी ॥ त्वच्चरणीं या तत्पर आहे कीं प्रिया ॥ गौरी हराची शपथ आपणा कां चिंता करितां अंत-र्यामीं मंदिरीं या ॥ ध्रु० ॥

पद ७ वें. ( चतुर सुगरनार या चा० )

**दयासागर**--मदन ताप अपरिहार ॥ जाहलाच थंड-गार ॥ मत् चित्त भ्रांतीचा ॥ लोप होय साचा॥ सन्मित्र प्रीतीचा ॥ कळस जाहलाच आज सकल दुरित होयदूर ॥ ध्रु० ॥ पवित्र युवती विषयिं आस ॥ धरिल त्यास नरकवास ॥ घडुनि अदय कालदास ॥ छळुनि सतत ॥ क्लेश अगणित अक्षय देतात ॥ हें शस्त्रा सन्मित्रा ॥ स्वर्गीच्या सहवासा ॥ ध्यायाला सत्वर हो तयार ममत्व टाकुनी हो कठोर ॥ ध्रु० ॥

पद ८ वें. भैरवी.

**महानंदा**--शिव शंभो शशांका । कां प्राण संजीवना हरिलें । मदंकाकांहो विटला प्रियकरा याकालीं मृत्युलोका त्यजुनि ॥ भुललाका सुरलोका ॥ध्रु०॥

पद ९ वें.

**सत्वदर्शनः**-- स्वर्गलोकीं मज टाकुनी गेलात दुःखनि-धीमाजी फेंकूनदूर ॥ प्रेमास सर्वस्वीविसरूनजाऊन स्वर्गास भूलून गेलातकां ॥ त्रिकोन साधून चौकोन साधा या ॥ पश्चात् मजसी ठेवियले ॥ सत्प्रीति चौरंग करीन क्षणांत ईशपदांबुज सेवावया॥ध्रु०॥

पद १० वें.( मधुकर नलिनिस भेटला या चा० )

**राजा विश्वरूप**--पर धन वमनचिकीं असे ॥ चंचल विभवा भुलुनि धना असतिल नृपतीजे त्यांच्या

सत्तेचा क्षणभरि भरँवसा महिवरती नसे ॥ प्रिय धर्म नीति मज आवडे ॥ अपकीर्तिचा ममनास नच शिवो दुष्ट गंध॥ सद्गुरुनाथा माझें तारण करा ॥ हीचपदांबुजिं सविनय विनती कीं असे ॥ ध्रु० ॥

पद ११ वें ( साकी )

**चिदानंद**–सत्व दर्शनें पवित्र युवतिस मित्रा अर्पण केली ॥ परी सतीनें पावन राहुनि सकलांमुक्ति दिधली ॥ प्रेमास्तव सगळे ॥ श्रीशिव चरणीं रत झाले ॥ ध्रु० ॥

पद १२ वें भरतवाक्य ( गिरिवरहिमनग या चा०

**सर्वपात्रें**–प्रेम रसाचा घेउनि घुटका ब्रह्मपदीं नाचा ॥ बुधहो ॥ रतव्हा ॥ जगतीं ॥ हरि चरणीं ॥ प्रीतीचें चारित्र ॥ कीर्तीहें विचित्र ॥ आदरास पात्र ॥ होउनि सर्वत्र ॥ आनंद झाला ॥ सच्चित्सुखघन ॥ आनंद निधान ॥ चरण कमलीं तल्लिन व्हा ॥ नच हें विसरा ॥ भव सिंधुतरा ॥ ईश्वरावरती सतत विश्वास ठेवाल तरीच अक्षय आनंद सेवाल साचा ॥ ध्रु० ॥

पद १३ वें ( ईशस्तुति )

**वारांगना**–प्रेम ॥ प्रेम ॥ प्रेमासी या नाहीं पारावर लोकीं या खचित सखयानों ॥ प्रेम ॥ प्रेमाला मोल या नाहींच जगतीं ॥ ध्रु० ॥ प्रीतिपाशीं

जग जखडीलें ॥ अणुरेणूसी व्यापुनिउरलें
प्रेम हेंच ईश्वर रूपाचें ॥ रूपक आहे रमणि
साचें ॥ आदि अंतना मध्य जयासी ॥ पार
लागे यद्विभवासी ॥ प्रेमनसे तिथं राम नसे ।
प्रेमाला या वानूं किती प्रेम ॥ ध्रु० ॥

**पांचवा अंक समाप्त ५.**

( श्रीसद्गुरुचरणारविंदार्पणमस्तु. )

समाप्त.

MADHAV NARAYAN PATANKA
"Patankar Sangit" Company
POST-GIRGAON
BOMBAY.

८२

# विक्रय्यपुस्तकें ।

## पाटणकरकृत संगीत व इतर पुस्तकांची सूची

| | | | | किंमत रु. आ. |
|---|---|---|---|---|
| संगीत विक्रमशशिकला | ... | ... | ... | ०–१२ |
| संगीत सत्यविजय | ... | .... | ... | १– ० |
| संगीत सीमंतिनी... | .... | ... | ... | ०–१ |
| संगीत युवतिविजय | .... | ... | .... | ०–१२ |
| संगीत वसंतचन्द्रिका | ... | ... | .... | ०–१२ |
| संगीत राजविजय (पद्यावली) | ... | | .... | ०– |
| [illegible]त समाजसंजीवनी | ,, | ... | .... | ०– |
| [illegible]त वत्सला | ,, | .... | .... | ०– |
| [illegible]ीत कनककांता | ,, | ... | .... | ०– |
| [illegible]गीत वीरात्रिविक्रम | ,, | ... | .... | ०– |
| अधिकारमदविपाक नाटक | | .... | .... | ०–१ |



उ
हीं
आणि
व दामुल
मिळती